महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०

संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: evaluationdept@maa.ac.in


---

# Question Bank

Standard:- 10th

Subject:- अक्षरभारती

## March 2021

**सूचना**

१. फक्त विद्यार्थ्यांना प्रश्नप्रकारांचा सराव करून देण्यासाठीच

२. सदर प्रश्नसंचातील प्रश्न बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेत येतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.

# इयत्ता 10 वी घटकनिहाय प्रश्नपेढी
## विषय मराठी (अक्षरभारती )

**विभाग १ : गद्य**

## ३. शाल – रा.ग.जाधव

## कृती क्रमांक : १

**प्र.१.अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **गुण (०७)**

**आकलन कृती**

**१)एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(०२)**

**१.म्हातारा भिक्षेकरी कोठे बसला होता?**

**२ .भिक्षेकऱ्याने अंगावर व अंगाखाली काय पांघरले होते?**

पुढे चार-पाच दिवस मला काही कामांमुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही. त्यानंतर मी नेहमीप्रमाणे ये-जा करत राहिलो. मग एकदम त्या भिक्षेकरी वृद्धाची आठवण आली. तो नेहमीच्या ठिकाणी नव्हताच. तेथील पुलावर चक्कर मारावी म्हणून मी उठलो व पुलावरून चालू लागलो.

पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला. मी लगबगीने त्याच्याकडे गेलो. पाहतो तो काय, तीच चिरगुटे अंगाखाली व अंगावर, तेच कुडकुडणे, तेच दीनवाणे जिणे!

मी म्हटले, ''बाबा, तुम्ही मला ओळखले?''

त्याने नकारार्थी मान हलवली.

मग मीच म्हटले, ''बाबा, पाच-सहा दिवसांपूर्वी मी तुम्हांला दोन शाली दिल्या होत्या. आठवते?''

यावर म्हातारा खुलला व पुन्हा हात जोडून म्हणाला, ''हे भल्या माणसा, तू लई मोठा! म्यास्नी शाली दिल्या! पण बाबा, म्या भिकाऱ्याला शाली कशा शोभतील? त्या शोभेपेक्षा पोटाची आग लई वाईट! मी शाली इकल्या व दोन-तीन दिवस पोटभर जेवून घेतलं बाबा! आमचं हे असलं बिकट जिणं! तुझं लई उपकार हायेत बाबा.''

शालीची शोभा आणि ऊब व पोटाची आग आणि अन्नाची ऊब!

भुकेल्यास अन्न द्यावे, तहानलेल्यास पाणी द्यावे आणि हेही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या शाली तरी द्याव्यात!

२) आकृतिबंध पूर्ण करा (०२)

शाली विकल्यावर भिक्षेकऱ्याने व्यक्त केलेल्या भावना

३.स्वमत कृती (०३)

'पांघरण्यासाठी दिलेल्या शाली भिक्षेकऱ्याने विकल्या' त्याची ही कृती तुम्हांस योग्य वाटते की अयोग्य हे सकारण लिहा.

*******

# कृती क्रमांक : 2

1.(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : गुण (7)

१.चौकटी पूर्ण करा. (०२)

१)प्रत्येक कार्यक्रमात सन्मान म्हणून दिले जाते –

२) लेखक वाईला येथे राहत होते –


एकदा मी पु. ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईंनी मला थांबवले व विचारले, ''तुम्हांला शाल दिली तर चालेल काय?''

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु. ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, ''त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस.'' या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.''

२) आकृतिबंध पूर्ण करा (०२)




३.स्वमत कृती (०३)

‘शालीमुळे शालीनता जाते’ विधान स्पष्ट करा.

*********

# पाठ क्र .४ उपास –पु.ल.देशपांडे

## कृती क्रमांक 1

1. (अ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (7 )

१:–(i)आकृती पूर्ण करा. 1

लेखकाने उपोषण सुरू केल्यावर लोकांची ऐकू येणारी बोलणी–

(ii)चौकट पूर्ण करा. 1

लेखकाची आस्था ज्या शब्दांबद्दल वाढू लागली ते शब्द–

माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येताजाता ही माझी ‘नाही ती भानगड’ आहे, उगीच ‘हात दाखवून अवलक्षण’ आहे, ‘पेललं नाही तेव्हा खाजगी झालं!’ अशी वाक्ये माझ्या कानांवर येऊ लागली; पण मी कोणत्या ही टीकेला भीक घालणार नव्हतो. ‘एकशे एक्क्या ऐंशी पौंड.’ रात्रंदि वस ते कार्ड माझ्या डोळ्यां पुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहि जे, या वि चाराने माझी झोप उडाली. झोप कमी झाली तर वजन उतरते या वि चाराने मला त्या चेही काही वाटत नव्हते. मी पूर्वी सारखा गाढ झोपत नाही यावर धर्म पत्नी चा मात्र अजि बात वि श्वा स नव्हता. ‘‘घोरत तर असता रात्रभर!’’ अशासारखी दुरुत्तरे ती मला करत असे.

‘‘दोन महि न्या त पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!’’ अशी भीष्मप्रति ज्ञा करून मी आहारशास्त्रा वरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ , चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दां बद्दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दि सता नुसत्या ‘कॅलरीज’ मला दि सू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी, की वजन उतरवण्या च्या शास्त्रा त पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यां नीच मला ‘डाएटचा’ सल्ला दि ला. उदाहरणार्थ – सोकाजी त्रिलोकेकर.

२) कोण ते लिहा. 2

१)लेखक पूर्वीसारखे गाढ झोपत नाही यावर विश्वास न ठेवणारी ------

२) लेखकाला डायटचा सल्ला देणारा -----------

3 स्वमत कृती : 3

तुम्ही केलेल्या एखाद्या भीष्म प्रतिज्ञेबद्दल माहिती लिहा.

********

# कृती क्रमांक 2

1.(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : गुण (7)

१.आकलन कृती

आकृतीबंध पूर्ण करा. 2

चाळीतल्या लोकांनी लेखकाला वजन नियंत्रणासाठी सोडायला सांगितलेल्या गोष्टी.

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

"तुला सांगतो मी पंत, 'डाएट' कर. बटाटा सोड. बटाट्याचं नाव काढू नकोस."

"हो! 'म्हणजे कुठं राहाता?' म्हणून विचारलं तर नुसतं 'चाळीत राहातो' म्हणा. 'बटाट्याची चाळ' म्हणू नका. वजन वाढेल! खी: खी: खी:!" जनोबा रेगे या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही. नेहमी तिरके बोलायचे म्हणजे काय!

पण सोकाजींनी त्याला परस्पर जामून टाकले. "ए इडिअट! सगळ्याच गोष्टींत जोक काय मारतोस नेमी? मी सांगतो तुला पंत-तू बटाटा सोड." मी काय काय सोडले असता माझे वजन घटेल याची यादी बटाट्यापासून सुरू झाली.

"बटाट्याचं ठीक आहे; पण पंत, आधी भात सोडा." एक सल्ला. "भातानं थोडंच लठ्ठ व्हायला होतं? आमच्या कोकणात सगळे भात खातात. कुठं आहेत लठ्ठ? तुम्ही डाळ सोडा." काशीनाथ नाडकर्णी.

"मुख्य म्हणजे साखर सोडा."

"मी सांगू का? मीठ सोडा."

"लोणी-तूप सोडा-एका आठवड्यात दहा पौंड वजन घटलं नाही तर नाव बदलीन. आमच्या हेडक्लार्कच्या वाइफचं घटलं."

"तेल आणि तळलेले पदार्थ आधी सोडा." बाबूकाका.

"दिवसा झोपणं सोडा."

"खरं म्हणजे पत्ते खेळायचं सोडा. बसून बसून वजन वाढतं."

मी मात्र या सर्व जनांचे ऐकून मनाचे करायचे ठरवले होते. पहिला उपाय म्हणून मी 'आहारपरिवर्तन' सुरू केले.

2.आकलन कृती –

कोण ते लिहा. 2

अ)लेखकाला तेल व तळलेले पदार्थ सोडायला सांगणारे -----------

आ)उताऱ्याच्या आधारे `आहारपरिवर्तन` हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

3. स्वमत 3

'लेखकाने ऐकावे जनाचे करावे मनाचे असे ठरवले' लेखकाच्या या मताशी तुम्ही सहमत आहात का?'

*******

# कृती क्रमांक 3

1.(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : गुण (7)

1आकलन कृती

(i) एका वाक्यात उत्तरे लिहा. 2

१) उपास हे कोणाचे खास कुरण होते ?

२) लेखकाच्या वजनक्षय संकल्पाला कोणी सुरुंग लावला

''उगीच आरडाओरडा नका करू. वजनाचं ते काय मेलं? होईल हळूहळू कमी आणि कोणाचं मागून खात नाही म्हणावं आम्ही. स्वत:च कमवून खातो म्हणावं. वाढलं तर वाढू दे वजन.'' मुलांना देण्यासाठी लाडू काढून बशी ठेवत आणि माझ्या वजनक्षय-संकल्पाला आणखी नवे सुरुंग लावीत ती उद्गारली.

''लाडू कशाला केलेस? साखर असेल त्यात!''

''इश्श! साखरेशिवाय लाडू आमच्या नाही घराण्यात केले कुणी!''

तात्पर्य, चहा बिनसाखरेचा होता हे खरे; परंतु लाडवाच्या रूपाने काही कॅलरीज पोटात गेल्याच!

दोरीवरच्या उड्यांचा फक्त एकदा प्रयत्न केला व पहिली उडीच शेवटची ठरली, कारण आठ गुणिले दहाच्या आमच्या दिवाणखान्यात प्रथम दोरी संपूर्ण फिरवणे अवघड. एकदा डोक्यावरून दोरी पलीकडे गेली ती ड्रेसिंग टेबलावरच्या तेलांच्या व औषधांच्या बाटल्या खाली घेऊन आली. दुसऱ्यांदा अर्धवट गॅलरी आणि अर्धवट घरात राहून दोरी फिरवली ती आचार्य बर्व्यांच्या गळ्यात. त्यांचा माझ्यावर आधीच राग होता. मी उपास करतो हे कळल्यावर चाळीतली सारी मंडळी समाचाराला येऊन गेली; परंतु आचार्य बाबा बर्वे शेजारच्या खोलीत असूनही आले नाहीत, कारण 'उपास' हे त्यांचे खास राखीव कुरण होते.

''हा दुष्टपणा माझ्या गळ्यात दोरी अडकवून केलात हे ठीक झालं; पण तुमच्या वयाला न शोभणाऱ्या ह्या धिंगामस्तीला दुसरा कोणी माझ्यासारखं बळी पडला असता, तर तुमची धडगत नव्हती. मी तुम्हांला क्षमा करतो.''

2 . आकलन कृती

1) खालील घटनेचा परिणाम लिहा. 1

घटना. लेखकाने दोरीवरची पहिली उडी मारली.

परिणाम. ------------------------------------------

2) पुढील विधान सत्य की असत्य ते लिहा. 1

बाबा बर्व्यांचा लेखकावर आधीपासूनच राग होता.-------------

3. स्वमत 3

'लेखकाने ऐकावे जनाचे करावे मनाचे असे ठरवले' लेखकाच्या या मताशी तुम्ही सहमत आहात का ?

*******

# कृती क्रमांक 4

1.(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : गुण (7)

1.आकलन कृती .

खालील चौकटी पूर्ण करा. 1.

i) १) लेखकाचे कुचकट स्वभावाचे शेजारी– [ ]

२) लेखकाने वजनकाट्यात टाकलेले नाणे – [ ]

ii) लेखकाचे वजन कमी करण्याचे दोन खात्रीशीर उपाय– ---------- 1.

पंधरवडाभरात फक्त दोन वेळाच साखरभात झाला. एकदा सोकाजीने चोरून कोळंबीभात चारला व खालच्या मजल्यावरच्या भाऊजी पसरटवारांनी एकदा नागपुरी वडाभात पाठवला होता. एवढे अपवाद वगळल्यास भाताला स्पर्श नाही केला. त्यामुळे मुख्यत: चरबीयुक्त द्रव्ये शरीरात कमी गेली. माझा एकूण निश्चय पाहून चाळीतल्या मंडळींचे आदर दुणावल्याचे माझ्या सूक्ष्म नजरेतून सुटत नव्हते. जी मंडळी माझी, माझ्या डाएटची आणि उपासाची चेष्टा करत होती त्यांनीच ''पंत, फरक दिसतो हं!'' अशी कबुली द्यायला सुरुवात केली.

जनोबा रेग्यांसारख्या अत्यंत कुजकट शेजाऱ्यालाही ''पंत, भलतेच काय हो रोडावलेत.'' असे मान्य करावे लागले. मंडळींच्या प्रशस्तीने मला भीती वाटत होती ती एकाच गोष्टीची म्हणजे मूठभर मांस वाढण्याची; पण असली तुरळक तारीफ ऐकून मी चळण्यासारखा नव्हतो.

इतक्या असामान्य मनोनिग्रह आणि जिव्हानियंत्रणानंतर कमीत कमी वीस ते पंचवीस पौंडांनी तरी माझे वजन घटले पाहिजे अशी माझी खात्री होती व त्या खात्रीने मी आमच्या ऑफिससमोरच्या वजनाच्या यंत्रावर पाय ठेवला आणि आणेली टाकून तिकीट काढले. महिन्यापूर्वी याच यंत्राने माझे वजन एकशे एक्याऐंशी पौंड दाखवले होते. एक महिन्याचा उपास, निराहार, शास्त्रोक्त आहार, दोरीवरच्या उड्या इत्यादी उग्र साधना केल्यावर आज तिकिटावर वजन...

मिनिटभर माझा विश्वासच बसेना. एकशे ब्याण्णव पौंड आणि भविष्य होते : 'आप बहुत समझदार और गंभीर है!'

हल्ली मी वजन आणि भविष्य या दोन्ही गोष्टींची चिंता करायचे सोडून दिले आहे आणि विशेषत: डाएटच्या आहारी तर या जन्मात जाणार नाही. छे, छे, वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो.

**2.आकलन कृती–**

**1)योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.**

**अ)जवळजवळ ––––––––––––––––––दिवस हा क्रम चालू होता.**

**( पाचसहा, सातआठ ,नऊदहा ,दहाबारा)**

**आ) दुर्दैवाने रोज गाईचे…………… दूध मिळण्याची सोय नव्हती.**

**(ताजे, सकस ,गरम, धारोष्ण)**

**२) अनेक शब्दांसाठी एक शब्द लिहा.** **1.**

**१) साखर घालून केलेला भात ––––––––––––––––**

**२) पंधरा दिवसांचा समूह––––––––––––––.**

**3. स्वमत :** **3.**

**लेखकाने आपले आहार व्रत कसे चालू ठेवले होते ते तुमच्या शब्दांत लिहा.**


******

## पाठ क्र .७ फूटप्रिन्ट्स – डॉ. प्रदीप आवटे

## कृती क्रमांक : 1

**1. (अ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा :** **गुण (7 )**

**1. आकृती पूर्ण करा.** **2**



"अवो, स्नेहाताई, मी कुठं एसीत बसूनशान काम करत्ये बाई. शेनामातीत काम करावं लागतं! आन आमच्या वस्तीचा रस्ता बी समदा उखणलाय. समदी धूळ लागती पायास्नी. आन धा–धा मिन्टाला हातपाय धोयाला येळ बी नाय आन पानी तरी कुठं हाय बक्कळ ?"

"सॉरी, मावशी खरंच सॉरी," आपण त्यांच्या मळकट पायांबद्दल बोललो याचं स्नेहललाही कसंतरी वाटलं. तिला टाचेला फाटलेली, अगदी पातळ झालेली त्यांची चप्पल आठवली. रेखामावशीच्या खणखणीत आवाजानं सुमितही जागा झाला आणि हॉलमध्ये आला. सगळा प्रकार त्याच्या लक्षात आला. तेवढ्यात पावडेकाकाही आले. आज बाबा आणि पावडेकाका कुठल्याशा कार्यक्रमाला जाणार होते. स्नेहलने पावडेकाकांना पाणी दिलं. फरशी पुसणाऱ्या रेखामावशींचं लक्ष पावडेकाकांच्या तळव्याकडं गेलं. एकदम गोजिरा, गुलाबी तळवा. कुठं चिरण्या नाहीत की काही नाही! 'एकदम लोन्यागत पाय हाय काकांचा', रेखामावशी स्वत:शीच पुटपुटल्या. त्यांनी स्वत:च्या पायाकडं पाह्यलं... पायाला किती तरी चिरण्या पडल्या होत्या.. माती धूळ बसून त्या काळ्या पडल्या होत्या. अभिषेक–स्नेहलचे बाबाही तयार होऊन हॉलमध्ये आले.

"मामा, मी एक ॲप तयार केलं आहे. त्या ॲपच्या साह्यानं आपण कोणाचे पाय किती स्वच्छ आहेत, हे सांगू शकतो", सुमितनं सांगितलं.

"सुमित, अरे, पाय स्वच्छ आहेत की नाही, हे सांगायला ॲपची काय गरज आहे? तुम्हां टेक्नोसॅव्ही लोकांना कशाचंही ॲप करण्याशिवाय काही सुचतं की नाही? अरे, सगळ्यात भारी ॲप डोक्याच्या कवटीत आहे, हे विसरलात की काय तुम्ही लोक?" बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दलची आपली मळमळ व्यक्त केली.

"मामा, गंमत तर बघ तू माझ्या ॲपची...त्याचं नाव आहे फूटप्रिन्टस", असं म्हणत सुमितनं आपला स्मार्टफोन काढला.

**2. अ) आकृती पूर्ण करा .** **1**

पावडे काकांच्या तळव्यांची वैशिष्ट्ये → [ ] , [ ]

**आ) एका वाक्यात उत्तर लिहा .** **1**

सुमितने तयार केलेले ॲप कोणते ?

**3.स्वमत –** **3**

तुमच्या घरी येणाऱ्या कामवाल्या मावशींचा अनुभव थोडक्यात सांगा .

********************

# कृती क्रमांक 2

**1.(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **7**

**1) कोण ते लिहा :** **2**

अ ) रेखा मावशींना सायकल घेऊन देणारा –

ब ) झऱ्याच्या स्फटिक स्वच्छ पाण्यासारखे पाय असणाऱ्या –

क ) स्वच्छ आणि मऊसूत पाय असणारे –

ड ) पायाची स्वच्छता बघणारा –

"गेल्या महिन्यापतुर चालतच येत हुते ; पण आता माझ्या लेकानं एक सायकल दिलीया मला. तवा आता सायकलनं येते", अशी अजून बरीच माहिती त्यांना भरली. आठवड्यातून सरासरी किती किलोमीटर फिरती होते? ही फिरस्ती तुम्ही कशी करता? आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत?

रेखा मावशी फिरायच्या पायीच, कधीतरी सायकलनं ! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढंही त्यांनी दोन झाडं लावली होती. त्यातलं एक लिंबोणीचं होतं ; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. " आणि आता पाहा, या आहेत रेखा मावशींच्या फूटप्रिन्ट्स.... ! असं म्हणत त्यानं मोबाईलचं कसलंसं बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा ! सगळे 'आ' वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली... एकदम चंदेरी वर्खात मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले... 'सिल्व्हर फूटप्रिन्ट्स ! दि मोस्ट क्लीन फूटप्रिन्ट्स !!'


"वाऽ पाह्यलंत रेखामावशीचे पाय चंदेरी आहेत. एकदम स्वच्छ. झऱ्याच्या स्पटिक स्वच्छ पाण्यासारखे," सुमित ओरडला. "ह्याऽ हे भलतचं !" रेखामावशींच्या पायाकडे पाहत पावडे काका म्हणाले.

सुमितनं हलकेच पावडेकाकांच्या गोजिऱ्या तळव्यांकडे पाहिले आणि म्हणाला, "काका, आपण तुमच्या पायाचं पाहूया का?


" त्यात पाह्यचं काय ? हे बघ, माझे पाय किती स्वच्छ आणि मऊसूत आहेत...!" पावडेकाका पाय सगळ्यांना दाखवत म्हणाले. "पण मला काय सांगतंय तुमचं ॲप, ते तरी पाहूया," त्यांनी पुस्ती जोडली.

**2) आकृती पूर्ण करा :** **2**

**अ )**




**आ )**




**3) स्वमत :** **3**

**जागतिक तापमान वाढ नियंत्रित करण्यासाठी कोणती उपाययोजना करणे आवश्यक आहे असे तुम्हाला वाटते ते तुमच्या शब्दात लिहा.**

************

# कृती क्रमांक 3

**1.(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **गुण 7**

**1. पावडेकाका व रेखा मावशी यांच्या पावलान मधील फरक खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.** **2**

| व्यक्ती | पावलांचा रंग | पावलांच्या रंगाचे कारण |
|---|---|---|
| रेखामावशी | | |
| पावडेकाका | | |

"काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही, म्हणून तर त्यांची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत", सुमित बोलत होता. "बापरे, आपण फरशी घाण होण्याची गोष्ट करतो; पण आपण तर अवघं वातावरणच घाण, प्रदूषित करत असतो. किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना! ग्लोबल वॉर्मिंगला हातभार लावतो आपण. तापानं फणफणलीय आपली धरती, आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा. मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशींसारखे चंदेरी हवेत", स्नेहल गहिवरून म्हणाली.

अभिषेक भारावून म्हणाला, "माझ्या तर कॉलेजसमोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये-जा करणार. ठरलं एकदम!"

"खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो. बसनं प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटतं; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट", अभिषेकचे बाबा म्हणाले.

**2. आकृती पूर्ण करा.** **2.**

i) **वाढत्या कार्बनचा पृथ्वीवर होणारा परिणाम**

ii) **कार्बनचे प्रमाण कमी करण्यासाठीच्या उपाययोजना**

**3. स्वमत :** **3.**

**तुमची शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या उपाययोजना कराल ते तुमच्या शब्दांत लिहा.**


*********

## पाठ क्र.८ ऊर्जाशक्तीचा जागर – डॉ. रघुनाथ माशेलकर

## कृती क्रमांक : १

**प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **( गुण 7 )**

**1. 1)आकृती पूर्ण करा.** **1.**





**2) 'आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते.' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.** **1.**

शाळा आणि शिक्षक असा विषय निघाला, की मला माझी मुंबईतील शाळा आणि शालेय जीवनातील शिक्षकांची आठवण येते. गिरगावातील युनियन हायस्कूल आणि माझ्या शाळकरी वयात आपुलकीनं संस्कार करणारे भावे सर, जोशी सर, शिर्के सर या साऱ्यांचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे; पण त्याचवेळी हेही सांगितलं पाहिजे, की या शाळेशी आणि या संस्कार देणाऱ्या शिक्षकांशी माझा जो संपर्क आला, तो जिच्यामुळे आला ती माझी परमप्रिय आई आणि माझे मामा यांचे ऋण मी कसे व्यक्त करणार? आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते. माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती, तर माझे सर्वस्व होती.

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा'तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहात होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होतं!

**2. आकृती पूर्ण करा.** **2.**




**3. स्वमत:** **3**

**'तुमच्या जीवनातील शिक्षकांचे स्थान' या विषयावर तुमचे विचार लिहा.**

********************

# कृती क्रमांक : २

**प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **( गुण 7 )**

**1. 1.कोण ते लिहा.** **1.**

अ) लेखकाला जीवनाचं तत्त्वज्ञान शिकविणारे ----

आ) लेखक पुन्हा मनोमनी जातो ते ठिकाण ------

**2.आकृती पूर्ण करा.** **1.**

शाळेने व शिक्षकांनी लेखकाला दिलेल्या गोष्टी

याच हायस्कूलमध्ये मला भावे सर भेटले. ते आम्हाला भौतिकशास्त्र शिकवत. विज्ञानातील हा विषय शिकवताना त्यांनी केवळ शास्त्र शिकवलं नाही, तर त्या विषयाची गोडी लावली आणि त्याचबरोबर जीवनाचं फार मोठं तत्त्वज्ञान शिकवलं.



एके दिवशी शाळेत त्यांनी एक प्रयोग करून दाखवला. भिंगाच्या साहाय्यानं सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं आणि माझ्याकडे बघून ते म्हणाले, ''माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल.'' एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि दुसरीकडे विज्ञान समजलं.

आयुष्याचं फार मोठं तत्त्वज्ञान मला भावे सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं. त्यांना मी कसा विसरू शकेन? भावे सरांप्रमाणेच माझ्या शालेय आणि पुढील शैक्षणिक जीवनात जोशी सर, शिर्के सर, श्री. मालेगाववाला या सर्वांनीच माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी उत्तम मार्गदर्शन केलं, संस्कार केले. आयुष्याच्या उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर शिदोरी दिली. संघर्षासाठी आत्मविश्वास मिळवून दिला. जगण्याचे भान दिले. आजही फिरून ते शाळेचे दिवस आठवताना एकीकडे, प्रचंड दारिद्र्याचा सामना करतानाचे क्षण न् क्षण आठवतात आणि त्याचवेळी माझी आई, माझे शिक्षक, माझी शाळा हे 'माझे संस्कार केंद्र' डोळ्यांसमोर उभे राहते. मी पुन्हा मनोमनी शाळेत जाऊ लागतो.

**2. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **2.**

अ) कागद कशामुळे जळाला?

आ)लेखकाची संस्कार केंद्रे कोणती?

**3. स्वमत :** **3.**

' आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते' याविषयी तुमचे विचार स्पष्ट.

**************

# पाठ क्र. ११ जंगल डायरी – अतुल धामणकर

## कृती क्रमांक : १

**प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ( गुण 7 )**

1. लेखकाने बिबळ्याची ताजी पावलं पाहिल्यानंतरच्या कृतींचा घटनाक्रम लिहा. ( २ गुण)

१. जंगलाच्या कोपऱ्यात हालचाल जाणवली.

२. -------------------------------

३. -------------------------------

४. तिथं तेंदूच्या झाडाखाली बांबूमध्ये बिबळ्या बसला होता.

५. ------------------------------

६. ------------------------------

७. वनरक्षकाचा पाय काटकीवर पडला.

ता.२७ मे १९९७, वेळ-सकाळी ६ ते ९.३०, कोळसा परिक्षेत्र, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.

आज पहाटेच कोळसावन विश्रामगृहातून बाहेर पडलो.

गावातून टोंगे वनरक्षक आणि त्यांचा सहकारी वनमजूर येताना दिसले. वनरक्षक येताच आम्ही डावीकडं जाणारा झरी रस्ता धरला. समोर चालणारा वनमजूर अचानक थबकला. मी प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं, तर त्यानं रस्त्याकडं बोट रोखलं. नुकत्याच गेलेल्या एका मोठ्या बिबळ्याची ताजी पावलं तिथं उमटली होती. हा एक नर असून आम्ही पोहोचण्याच्या तासाभराआधीच इथून गेला असावा. मी चौफेर पाहिलं; पण मला तरी काही दिसलं नाही.

अचानक मला जंगलाच्या कोपऱ्यावर थोडीशी हालचाल जाणवली. मी सगळ्यांना हातानंच थांबायची खूण केली. दुर्बीण डोळ्यांना लावल्यावर ती हालचाल स्पष्ट झाली. तिथं एका तेंदूच्या झाडाखाली, बांबूमध्ये बिबळा बसला होता; पण त्याचा रंग आसपासच्या परिसराशी एवढा मिसळून गेला होता, की त्याची शेपूट जर हलली नसती, तर तो मला मुळीच दिसला नसता. त्याची पाठ आमच्याकडं होती, त्यामुळे त्यानं अद्याप आम्हांला पाहिलं नव्हतं; पण तेवढ्यात टोंगे वनरक्षकांचा पाय एका वाळक्या काटकीवर पडला आणि 'कट्' असा आवाज झाला. तिखट कानांच्या बिबळ्यानं तो आवाज ऐकताच वळून पाहिलं आणि एकाच झेपेत तो जंगलात अदृश्य झाला.

२. (आकलन)

१. चौकट पूर्ण करा. (०१ गुण)

अ.) प्रकल्पाचे नाव – [.................. ]

आ.) विश्रामगृहाचे नाव – [.................. ]

२. कारण द्या : (०१ गुण)

अ.) चालताना वनमजूर अचानक थबकला; कारण–............

३. स्वमत : (३ गुण)

भारतातील तुमच्या आवडीच्या अभयारण्यासंबंधित तुमचे मत थोडक्यात स्पष्ट करा.

*****

# कृती क्रमांक : २

प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ( गुण 7 )

1. (०२ गुण)

१. कृती पूर्ण करा.

अ.) वाघिणीच्या पिल्लांचे संभाव्य शत्रू –

अ)..................

ब)...................

"ऑऽ व्हऽऽ" अचानक नाल्याच्या पलीकडून आलेल्या या बारीक आवाजानं मी जागीच थबकलो. माझ्या अंगावर सरसरून काटा आला. एक वर्षाच्या वाघांच्या अभ्यासानं आणि अनुभवानं हे ठाऊक होतं, की हा वाघिणीचा आवाज आहे. ती या आवाजानं आपल्या पिल्लांना बोलवत असावी. अचानक पाण्यात 'धपकन' काहीतरी पडल्याचा आवाज आला. मी पाणवठ्याकडं पाहिलं आणि आश्चर्यानं थक्कच झालो. एका पिल्लानं बाजूच्या जांभळीच्या झाडीतून थेट पाण्यात उडी घेतली होती. लगेच त्याच्या पाठोपाठ उरलेली तीनही पिल्लं धपाधप पाण्यात उतरली. आईचा आश्वासक आवाज त्यांच्याकरता उत्साहाचं वारं भरणारा ठरला होता.

वाघीण रात्रीच पिल्लांना नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपवून शिकारीसाठी गेली होती. या परिसरात दुसरे नर वाघ, बिबळा, रानकुत्री अशा पिल्लांच्या संभाव्य शत्रूंचा राबता होताच. त्यामुळं तिला ही खबरदारी घेणं आवश्यकच होतं. वाघांच्या लहान पिल्लांना इतर भक्षकांपासून खूपच धोका असतो. त्यामुळं वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल भलतीच दक्ष असते. आता ती रात्रभर जंगलात फिरून पिल्लांजवळ परत आली होती. आईची हाक ऐकताच अजूनवर दडून बसलेली पिल्लं खेळकरपणे तिच्याकडं झेपावली होती. तेवढ्यात नाल्याच्या डावीकडच्या विरळ बांबूंमधून मला वाघीण येताना दिसली. ती सरळ पाण्याजवळ आली आणि वळून पाण्यात बसली. रात्रभरच्या वाटचालीनं थकून ती विश्रांती घेत होती; पण पिल्लांच्या उत्साहाला आई बघताच उधाण आलं होतं. त्यांतील एका पिल्लानं तर वाघिणीच्या पाठीवरच उडी घेतली; पण तिथून घसरल्यानं ते धपकन पाण्यात पडलं. तोंडावर पाणी उडताच वाघिणीनं मंदपणे गुरगुरून नापसंती व्यक्त केली; पण पिल्लांना त्याच्याशी काहीच देणं–घेणं नव्हतं. त्यांचा आईच्याभोवती जबरदस्त दंगाधोपा सुरू झाला.

२. (आकलन)

१. चौकट पूर्ण करा. (०२ गुण)

अ.) वाघिणीचा आवाज – [ .................. ]

आ.) वाघिणीने शिकारीला जायच्या आधी
पिल्ले इथे लपवली – [.................. ]

३. स्वमत. (०३ गुण)

वाघीण व तिच्या पिल्लांची भेट हा प्रसंग तुमच्या शब्दात शब्दबद्ध करा.

***********

# कृती क्रमांक : 3

प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ( गुण 7 )

०१. (आकलन)

१. कृती पूर्ण करा : (०२ गुण)

अ.) यापैकी एकाची वाघिणीने शिकार साधली असावी.

1)................ 2)................

3)................. 4).................

साधारणत: कुत्र्यापेक्षा लहान आकाराची ही पाच महिन्यांची पिल्लं होती. या वयात लहान मुलं जशी खेळकर असतात, तशीच ही खेळकर होती. एकमेकांचा पाठलाग करणं, मारामारी करणं, पाण्यात उड्या घेणं असे खेळ सुरू झाले. मध्येच आई वळून एखाद्या पिल्लाला मायेने चाटत होती. थोडा वेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली. डोकं वळवून तिनं हळूच 'ऑऽवऽ' असा आवाज केला. हा पिल्लांना मागं येण्याबद्दलचा इशारा होता. लगेच वळून ती चालायला लागली. हिनं जंगलात कुठंतरी नक्कीच एखादं सांबर, रानगवा, नीलगाय, रानडुकराची शिकार साधली असावी; पण अशी शिकार जड असल्यानं ती उचलून पिल्लापर्यंत आणणं शक्य नसतं. त्यामुळं पिल्लांजवळ येऊन घटकाभर पाण्यात बसून तिनं विश्रांती घेतली होती आणि आता ती पिल्लांना त्या शिकारीकडं घेऊन जात होती. या चार पिल्लांसोबतच स्वत:चं पोट भरण्यासाठी तिला सतत कोणती–कोणती शिकार करणं आवश्यकच होतं. त्या कलेत ही चांगली पारंगत होती.

वाघिणीनं नाला पार करून बांबूच्या गंजीत पाय ठेवला. आत शिरण्याआधी तिनं वळून पिल्लं सोबत येताहेत की नाही हे पाहून घेतलं. दोन पिल्लं तिच्या मागोमाग निघाली होती; पण दोघांना अद्याप भान नव्हतं. ती पाण्यातच एकमेकांशी खेळण्यात दंग झाली होती. वाघिणीनं परत त्यांना बोलावणारा आवाज काढला. आईच्या या आवाजाबरोबर दोन्ही पिल्लांनी आपला खेळ थांबवला आणि पळत सुटली. दोनच मिनिटांत पिल्लांना घेऊन वाघीण जंगलात दिसेनाशी झाली. आज मी वाघिणीतल्या आईची एक वेगळीच झलक बघितली होती. माझ्या व्याघ्रअनुभवात मोलाची भर घालणारा हा अनुभव होता.

२.  (आकलन)

**चौकट पूर्ण करा.** (०२ गुण)

**वाघिणीच्या पिल्लांचे खेळ –**

| ............... | ................ |
|---|---|

**३. (स्वमत) :** (०३ गुण)

'लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली' हे विधान उता–याच्या आधारे स्पष्ट करा.

*********

## पाठ क्र. १५ खरा नागरीक – सुहास बारटक्के

## कृती क्रमांक : १

**प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** ( गुण 7 )

१ ) कोष्टक पूर्ण करा (2 गुण )

पहाटेचे विशेष

निरंजन आज भल्या पहाटेस उठून अभ्यासाला बसला होता. आज शेवटचा, नागरिकशास्त्राचा पेपर. तो झाला, की संपलीच परीक्षा. इतिहास, भूगोल आणि नागरिकशास्त्र, तिन्ही विषयांचा केवढा अभ्यास करावा लागतो. त्यात हे नागरिकशास्त्र जरा अवघडच.

पहाटेची, सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, हा भडसावळे गुरुजींनी दिलेला सल्ला अगदी योग्य होता. सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजंतवानं बनलेलं असतं. प्रसन्न वातावरणामुळे मनही अभ्यासात चटकन लागू शकतं. हवेत सुखद गारवा असतो. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असतं. ते नसेल तर पक्ष्यांचं सुमधुर संगीत साथीला असतंच. अशा आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा एखादा श्लोक चटकन पाठ होतो. एरवी न कळलेलं गणित चटकन कळतं. त्याची रीतही लक्षात राहते, हा निरंजनचा अनुभव. त्यामुळेच भडसावळे गुरुजींचा हा सल्ला त्याला मोलाचा वाटे.

निरंजनची गुरुजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरुजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला– 'रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.'

२. अ) कारण लिहा : (०१ गुण)

निरंजन हा भडसावळे गुरुजींचा लाडका विद्यार्थी होता कारण कारण –............

आ) खालील दोन गोष्टींसाठी परिच्छेदात आलेला एक शब्द म्हणजे – (1गुण )

या विषयाचा पेपर झाला की परीक्ष संपली --------------

हा विषय जरा अवघड होता------------------

३. स्वमत : (३ गुण)

निरंजनचा मामा त्याच्याशी कसा वागला हे परिच्छेदाच्या आधारे लिहा..

*****

# कृती क्रमांक : 2

प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ( गुण 7 )

१)चौकट पूर्ण करा (2गुण )

[ ] ← भडसावळे गुरुजींनी निरंजनला केलेली मदत → [ ]

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरुजींवर श्रद्धा ठेवायचा आणि परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरुजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.

आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खूश होता. नागरिकांची कर्तव्ये कोणती? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे? लोकसभा म्हणजे काय? ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो? साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती. अभ्यास करता करता किती वेळ लोटला कुणास ठाऊक. निरंजन ताडकन उठून उभा राहिला. नऊ वाजून गेले होते. साडेदहाची परीक्षा. त्याआधी देशमुखांकडे जायचं होतं. केवढंतरी लांब चालायचं होतं. भराभर आवरून तो निघाला.

२. कारण लिहा : (०2 गुण)

अ.) निरंजन वार लावून जेवायचा कारण–............

ब.) निरंजन मनातल्या मनात उजळणी करत होता कारण–............

३. स्वमत : (३ गुण)

हक्काचे घर नसले की इतरत्र राहतांना लहानपणीच परिस्थितीशी जुळवून घ्यायला मुले शिकतात. तुमचे मत स्पष्ट करा.

*****

## कृती क्रमांक : 3

**प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ( गुण 7 )**

१) शब्दजाल पूर्ण करा (2 गुण )

(१)----(२)--- स्टेशनवर गेल्याने निरंजनचे होणारे नुकसान (३)-----(४) ----

मावशीचं घर गावाबाहेर डोंगरपायथ्याशी. मध्ये एक नदीही लागायची. पूर्वी ही नदी पाण्यात उतरूनच चालत चालत पार करायला लागायची; परंतु आता कोकण रेल्वे आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला. पुलाच्या एका बाजूने लोकांसाठी पायवाटही ठेवली होती. या पुलामुळं आता जाणं-येणं सोपं झालं होतं. निरंजन अभ्यासाची मनातल्या मनात उजळणी करत झपाझप चालला होता. वाटेत त्याला भला मोठा दगड पडलेला दिसला. कुणीतरी कामासाठी घेतला असेल आणि पुन्हा तसाच ठेवून दिला असेल. निरंजनने तो दगड उचलून बाजूला ठेवला. त्याला लोकांच्या या बेफिकीर प्रवृत्तीचा भयंकर राग येई. तुम्ही विसरलात; पण दुसरा ठेचकाळून जीवाला मुकतो त्याचं काय! असंच त्याचं म्हणणं. निरंजन पुलावर पोहोचला तेव्हा साडेनऊ वाजून गेले असावेत. आता नऊ पन्नासची गाडी येईल. धाड्धाड् आवाज करत दिमाखात पुलावरून जाईल. ही कोकण गाडी किती छान दिसते; पण दिसते न दिसते तोच लगेच बोगद्यात शिरते. काय मजा येत असेल नाही गाडीतून जायला? आपणही मोठं झाल्यावर गाडीतून फिरू, या विचाराने तो हुरळून गेला. तोच त्याचं लक्ष डाव्या बाजूस रुळाखाली पडलेल्या भल्या मोठ्या भगदाडाकडे गेलं. हे छिद्र कसलं? रोज नसतं बुवा, असं म्हणत त्यानं जवळ जाऊन पाहिलं तो कुणीतरी काँक्रीट फोडून रेल्वेचे रूळ वेडेवाकडे करून ठेवल्याचं त्याच्या ध्यानी आलं. निरंजनला आश्चर्यच वाटलं.

२. अ).चूक की बरोबर ते लिहा (१ गुण )

1) मावशीचे घर गावाबाहेर होतं.
2) निरंजन स्टेशनबाहेर पोहोचला तेव्हा दहा वाजले होते.

आ)चौकट पूर्ण करा (१ गुण )

निरंजन सावध होताच या गोष्टी विसरला – १-----
२-----

**३. स्वमत :** **(३ गुण)**

**आपण जे शिकतो ते आपण आचरणात आणले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने शिक्षण म्हणता येईल, तुमचे मत स्पष्ट करा.**

*****

# कृती क्रमांक : ४

**प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **( गुण 7 )**

१) अ) उताऱ्याच्या आधारे पाच हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा. (१ गुण )

ब)कोष्टक पूर्ण करा. (१ गुण )

[ ] ← निरंजनच्या कानात घुमू लागल्या → [ ]

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल. निरंजन एकदम सावध झाला. गाडी आली तर भयंकर अपघात होईल, हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळ्यांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी रेल्वेगाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानांत घुमू लागल्या. स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती. मग नापास. भडसावळे गुरुजींची मदत बंद. शिक्षणही बंद. रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होतं; परंतु मन मानायला तयार नव्हतं. त्याने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठलं. त्यांना पुलावरच्या खराब झालेल्या रुळांबद्दल सांगितलं; पण ते त्यांना खरंच वाटेना. अखेर निरंजनने आर्जवं केली, की निदान पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका. मी खोटं बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या. एवढं बोलल्यावर स्टेशनमास्तरांनाही त्याच्या बोलण्यात तथ्य वाटू लागलं. उगाच धोका नको म्हणून गाडी थांबवायला सांगून ते पुलाकडे निघाले. निरंजनने नेमकी जागा दाखवली.

२. आ)घटनाक्रम लावा: (२ गुण )

१)निरंजनने धावतच स्टेशन मास्तरांना गाठलं.
२)निरंजनने आर्जवं केली.
३)पुलावरच्या खराब झालेल्या रुळांबद्धल सांगितलं.
४)नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती.

**३. स्वमत** **(३ गुण )**

**कधी कधी छोटी मुलेही समाजोपयोगी असे मोठे काम करतात.तुमचे विचार स्पष्ट करा.**

# कृती क्रमांक : ५

**प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ( गुण 7 )**

१) आकृती पूर्ण करा.

अ) (१ गुण )

[ ] ← स्टेशनमास्तरांनी लगेच केलेल्या कृती → [ ]

ब) (१ गुण )

[ ] ← निरंजनच्या जवळ जाऊन वार्ताहरांनीकेलेल्या गोष्टी → [ ]

फारच भयंकर! कल्पना करता येणार नाही, असा भयंकर अपघात झाला असता. स्टेशनमास्तरांनी लगेचच गाडी दीर्घकाळ थांबवण्याचा आदेश दिला आणि ते या घटनेचा पंचनामा करायला लागले. घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, सारे अधिकारी तत्काळ त्या ठिकाणी जमा झाले. पहिली खबर देणारा म्हणून निरंजनलाही थांबावं लागलं. एवढा मोठा अपघात त्याच्या चाणाक्षपणामुळे टळला म्हणून त्याचं कौतुकही झालं; परंतु त्या वेळी निरंजन मात्र दूर एका झाडाखाली बसला होता. तो निराश झाला होता. त्याचा नागरिकशास्त्राचा पेपर चुकला होता. तो नापास होणार होता. त्याला गुरुजींकडून मिळणाऱ्या सगळ्या सवलती रद्द होणार होत्या. निरंजनच्या जवळ येऊन वार्ताहरांनी त्याचं नाव विचारलं. फोटोही काढला. निरंजन उदास मनाने घरी परतला.



२. आ)कृती पूर्ण करा (२ गुण )

1)घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ त्या ठिकाणी जमा झालेले –१)....२).....३).....४).....

2) उदास मनाने घरी परतणारा– .......


**३. स्वमत (३ गुण )**

**कधी कधी दुसऱ्याचे भले होण्यासाठी आपल्याला काही नुकसान सहन करावे लागते.**
**आपले मत व्यक्त करा.**

# कृती क्रमांक : ६

**प्र.1 अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **( गुण 7 )**

१) आकृतिबंध पूर्ण करा. (२ गुण )




दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात निरंजनाची स्तुती फोटोसकट छापून आली होती. भीषण अपघात टाळल्याचं श्रेय त्यालाच देण्यात आलं होतं. त्या दिवशी मावशीच्या घराकडे मोठमोठी माणसं आली. खुद्द जिल्हाधिकारी आले. शाळेचे मुख्याध्यापक आणि भडसावळे गुरुजीही आले. निरंजनने धावत पुढे होऊन गुरुजींचे पाय धरले. रडत रडत तो म्हणाला, ''गुरुजी, मी नापास होणार. माझा कालचा नागरिकशास्त्राचा पेपर बुडाला.''

''नाही रे बाळा. तू उत्तम नागरिक आहेस. शेकडो माणसांचा जीव वाचवलास आणि नागरिकशास्त्राच्या खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झालास. तुझं वर्ष कसं वाया जाईल? हे बघ, शाळेचे सगळे अधिकारी आलेत. खास बाब म्हणून तुझी नागरिकशास्त्राची परीक्षा उद्या घेतली जाणार आहे, जिल्हाधिकाऱ्यांनी तुला सरकारी वसतिगृहात प्रवेश द्यायचं ठरवलंय आणि वर वह्यापुस्तकांच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे. आता नको हं तुला वार लावून जेवायला.''

असं म्हणून गुरुजींनी निरंजनला हृदयाशी धरलं, तेव्हा साऱ्यांचेच डोळे पाणावले.

२. खऱ्या नागरिकाची कर्तव्ये (गुण 2 )

1)---------------
2)---------------
3)---------------
4)---------------

३. स्वमत (३ गुण )

'निरंजनच खरा नागरिक' हे तुमच्या शब्दात स्पष्ट करा.....

*********

## अपठित गद्य

# कृती क्रमांक 1

**1 .(इ ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा :** **गुण (4 )**

**(1) उत्तर लिहा :** **2**

i)ग्रंथपालाना काय संबोधले आहे ?


ii)फुले म्हणजे निसर्गाची  कोणती अभिव्यक्ती आहे असे लेखक म्हणतो.

पुस्तकांना आपण जवळ घेता घेता पुस्तकेही आपल्याला जवळ घेतात. वाचकांचा प्रवास हळूहळू लेखनापर्यंतही होऊ लागतो. शब्दांच्या छटांची  तरलता जगण्याचे उत्सव फुलवू लागते.

नव्या पिढीला माणूसपणाच्या तरलतम सुंदरतेकडे नेणं.  हे तर पालक व शिक्षकांचं मूळ कार्य !

या आनंदमय कामात ग्रंथ आपले प्रेरक ठरतात. म्हणूनच ग्रंथपाल हे ग्रंथसंस्कृतीचे लोकपाल असतात.

**(2 )पुढील आकृतिबंध पूर्ण करा.: 2**



# कृती क्रमांक 2

**1 .(इ ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा :** **गुण (4 )**

**1 एका वाक्यात उत्तरे लिहा.** **2**

1) परिच्छेदामध्ये या महिन्याचा उल्लेख आला आहे.

2) झाड या रंगांनी भरून टाकल आहे.

चैत्राचा महिना आहे. आसमंतातल्या साऱ्याच झाडांना पोपटी पालवी फुटली आहे. दृष्टी जाईल तिथं झाडाच्या फिक्या आणि गडद हिरव्या रंगानं अवकाश भरून टाकलं आहे.उन्ह तापत चाललं आहे. पण एवढ्या तीव्र उन्हातही ही झाडं भक्क उजेड पिऊन आतून रसरशीत आणि हिरवीगार दिसत आहेत.

ह्या झाडाचं प्रत्येक पान आणि हरेक डहाळी सौंदर्यानंदानं बहरली आहे. ते उंच पिंपळाचे झाड बघत रहावं असं आहे. त्याची ती लालस हिरवी पालवी, वाऱ्याच्या उष्ण झुळुकीनं सळसळणं,तीव्र उन्हाच्या उजेडातही मुग्ध बनून उभं असणं किती देखणं आहे! खरंतर हा ह्रदयाला आनंद बहाल करणारा दृष्टीचा पाडवाच आहे.

**2.) सहसबंध लक्षात घेऊन वाक्य पूर्ण करा..** **2**

1) पिंपळाच्या झाडाची लालसर हिरवी.................

2) ह्रदयाला आनंद बहाल करणारा...............

# कृती क्रमांक 3

1 .(इ ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (4 )

१)योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा. (2 )

i. बहुतेकजण परस्परांमधल्या नात्याबाबत गंभीर नसतात. 1

अ)कारण ते आधी दुसऱ्याचा विचार करतात नंतर स्वत:चा विचार करतात करतात

ब)कारण ते आधी स्वत:चा विचार करतातनंतर दुसऱ्याचा विचार करतात.

क)त्यांच्या दृष्टीने नातं ही एका अंतरावरली गोष्ट असते.

ड)त्यांच्या दृष्टीने नातं अवकाश देणारे असावे.

ii. आपल्या दृष्टिने नातं ही एक ..... 1

अ) गुंतलेली गोष्ट असते

आ) विखुरलेली गोष्ट असते.

इ) अंतरावरील गोष्ट असते.

ई) आपल्यासाठी सोईची गोष्ट असते.

दुसऱ्या माणसाशी असलेल आपलं नातं ही खरंतर किती महत्वाची गोष्ट आहे.बहुतेकजण परस्परांमधल्या नात्याबाबत गंभीर नसतात,कारण ते आधी स्वत:चा विचार करतात आणि नंतर दुसऱ्याचा विचार करतात. दुसरे आपल्यासाठी सोयीचे असतील, सुख देणारे असतील किंवा आपल्या विचारभावनांना अवकाश देणारे असतील, तरच आपण त्यांना विचारात घेतो.बऱ्याचदा आपल्या दृष्टीने नातं ही एक अंतरावरील गोष्ट असते.आपण एखाद्याशी नात्यानं जोडलेले आहोत म्हणजे त्यांच्यात गुंतलेलो आहोत,पूर्णपणे सामावले आहोत असा अनुभव म्हणूनच आपल्याला येत नाही.खऱ्या नात्यामध्ये संवेदना विखुरलेली विभागलेली नसते,एकात्म असते.मात्र आपण नात्यात संवेदनेचे वेगवेगळे स्तर अनुभवतो.

2 )वैशिष्ट्ये लिहा. 2

नात्यांमध्ये विखुरलेली संवेदना.

१).............

२)............

३)...........

४)........

## कृती क्रमांक 4

**1 .(इ ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा :** **गुण (4 )**

1. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. 02

i ) परिच्छेदामध्ये कोणत्या महिन्याचा उल्लेख आला आहे ?

ii ) झाड कोणत्या रंगांनी भरून टाकल आहे ?

चैत्राचा महिना आहे. आसमंतातल्या साऱ्याच झाडांना पोपटी पालवी फुटली आहे. दृष्टी जाईल तिथं झाडाच्या फिक्या आणि गडद हिरव्या रंगानं अवकाश भरून टाकलं आहे.उन्ह तापत चाललं आहे. पण एवढ्या तीव्र उन्हातही ही झाडं भक्क उजेड पिऊन आतून रसरशीत आणि हिरवीगार दिसत आहेत.

ह्या झाडाचं प्रत्येक पान आणि हरेक डहाळी सौंदर्यानंदानं बहरली आहे. ते उंच पिंपळाचे झाड बघत रहावं असं आहे. त्याची ती लालस हिरवी पालवी, वाऱ्याच्या उष्ण झुळुकीनं सळसळणं,तीव्र उन्हाच्या उजेडातही मुग्ध बनून उभं असणं किती देखणं आहे! खरंतर हा हृदयाला आनंद बहाल करणारा दृष्टीचा पाडवाच आहे.

2. सहसबंध लक्षात घेऊन वाक्य पूर्ण करा..

2

i )पिंपळाच्या झाडाची लालसर हिरवी.................

ii )हृदयाला आनंद बहाल करणारा...............

**विभाग २ : पद्य**

# 2. संतवाणी (अ) अंकिला मी दास तुझा

**प्रश्न 2 (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

**1) चौकटी पूर्ण करा.** **( 2 )**

अ) आगीत पडणारे → ☐

ब) हुंबरत धावणारी → ☐

अग्निमाजि पडे बाळू ।
माता धांवें कनवाळू ।।१।।

तैसा धांवें माझिया काजा ।
अंकिला मी दास तुझा ।।२।।

सर्वेचि झेंपावें पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।

भुकेलें वत्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ।।४।।

वणवा लागलासे वनीं ।
पाडस चिंतीत हरणी ।।५।।

नामा म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ।।६।।

**2) आकृती पूर्ण करा.** **( 2 )**

कोण ते लिहा.

----------------------------

| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
|---|---|---|---|
| कनवाळू | चिंतित | दास | विनवणारा |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| ☐ | ☐ | ☐ | ☐ |

**3) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा :** **( 2 )**

१) धरणी –

२) वन –

३) मेघ –

४) काजा –

4) काव्यसौंदर्य : ( 2 )

'तैसा धांवे माझिया काज । अंकिला मी दास तुझा ॥' या ओळीतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

************

**प्रश्न 2 आ) पुढील कवितेच्या त्याखाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

**अंकिला मी दास तुझा** (8)

( खालील पैकी कोणत्याही 5 कृती विचारल्या जातील )

**मुद्दे**

**१)प्रस्तुत कवितेचे कवी /कवयित्री:–** **(1)**

**२) प्रस्तुत कवितेतचा विषय :–** **(1)**

**३)कवितेतील दिलेल्या ओळीचा सरळ अर्थ लिहा–** **(2)**

'सर्वेची झेपावे पक्षिणी ।
पिल्ली पडतांची धरणी ॥'

**4)प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण –** **(2)**

**5) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश –** **(2)**

**6) प्रस्तुत शब्दांचा अर्थ – १) अंकिला –** **(2)**

**२) माता –**

**३) दास –**

**४) मेघ –**

********************

# 2.संतवाणी (आ) योगी सर्वकाळ सुखदाता

प्रश्न 2 (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:

1) चौकटी पूर्ण करा. ( 2 )

अ) चंद्रकिरण पिऊन जगणारा → [ ]

ब) पिल्लांना सहारा → [ ]

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी ।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।
उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ।।
मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।
अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।
तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।

2) आकृती पूर्ण करा. ( 2 )

योगी पुरुषाच्या चार विशेष बाबी
↓ ↓ ↓ ↓
[ ] [ ] [ ] [ ]

3) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा : ( 2 )

१) उदक –
२) मळ –
३) रसना –
४) निजज्ञान –

4) काव्यसौंदर्य: ( 2 )

योगी पुरुष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.

*************

## 5. दोन दिवस ( कविता ) – - नारायण सुर्वे

**प्रश्न 2. अ) खाली दिलेल्या कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा . (८)**

**1) आकृती पूर्ण करा**

**१) चौकटी पूर्ण करा. (१)**

1) कवींनी पोलादाची उपमा कशाला दिली – [ ]
2) कवींची जिंदगी काय करण्यात बरबाद झाली– [ ]

२) आकृती पूर्ण करा – (१)

[ ] ← कवी जगाच्या शाळेत हे शिकले → [ ]

*दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.*
*हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे*
*शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;*
*भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.*
*हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले*
*कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले*
*हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले*
*तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.*
*दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो*
*दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो*
*झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले*
*दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.*

2) कृती पूर्ण करा (२)

i) 'अथक व अखंड कष्ट करूनही आयुष्यभर गरिबीतच राहावे लागले' या आशयाची कवितेतील ओळ शोधा.

ii). 'झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले' या ओळीचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

3) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचे अर्थ लिहा– (२)

जग, जिंदगी, मित्र , दिवस.

4). खाली दिलेल्या ओळीचे आशय सौंदर्य स्पष्ट करा. (२)

"दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले,

हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे"

********************

प्रश्न 2 आ) पुढील कवितेच्या त्याखाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.

**'दोन दिवस'** (८)

( खालील पैकी कोणत्याही 5 कृती विचारल्या जातील )

**मुद्दे**

१)प्रस्तुत कवितेचे कवी /कवयित्री:- (१)

२) प्रस्तुत कवितेतचा विषय :- (१)

३)कवितेतील दिलेल्या ओळीचा सरळ अर्थ लिहा-

'शेकडो वेळा चंद्र आला ;तारे फुलले रात्र धुंद झाली
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली'

४) कवितेत आलेल्या शब्दांचे अर्थ लिहा- (२)

रात्र , साहाय्य , शेकावे, चंद्र

५) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण - (२)

******

## ९. औक्षण (कविता) - इंदिरा संत

प्रश्न 2. अ) खाली दिलेल्या कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा (8)

1) चौकटी पूर्ण करा. (2)

1) मुठीमध्ये जे नाही ते - [ ] 2) शिरेमध्ये जे नाही ते - [ ]

3)जीव असा आहे - [ ] 4) जवानाचे पाऊल असे आहे - [ ]

नाही मुठीमधे द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.

२) प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)

i) सैनिकांचे औक्षण कशाने केले जाते?

ii) दीनदुबळे असे कवयित्रींनी कोणाला उद्देशून संबोधले आहे?

३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचे पर्यायवाची शब्द लिहा. (2)

i) डोळे – ☐ ii) कल्लोळ– ☐

iii) शान – ☐ iv) औक्षण.– ☐

४ ) खालील ओळीतील तुम्हाला समजलेला विचार तुमच्या शब्दात लिहा. (2)

"वर् घोंघावे बंबारा, पुढे कल्लोळ धुरांचे,

धडाडत्या तोफांतून, तुझे पाऊल जिद्दीचे ;"

***************

**प्रश्न 2 आ) पुढील औक्षण कवितेच्या खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

**(8)**

( खालील पैकी कोणत्याही 5 कृती विचारल्या जातील )

## मुद्दे

**१)प्रस्तुत कवितेचे कवी /कवयित्री:-** **(1)**

**२) प्रस्तुत कवितेतचा विषय :-** **(1)**

**३)कवितेतील दिलेल्या ओळीचा सरळ अर्थ लिहा-** **(2)**

'जीव ओवाळावा तरी, जीव किती हा लहान

तुझ्या शौर्यगाथे पुढे ,त्याची केवढीशी शान;'

**४) कवितेत आलेल्या शब्दांचे अर्थ लिहा-** **(2)**

द्रव्य, शिर, रक्त, आसवं

**५) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण -** **(2)**


*******

# कविता १२ -- रंग मजेचे रंग उद्याचे

**प्रश्न 2 (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:**

**i ) आकृतीबंध पूर्ण करा .** **( २ गुण )**

1. **यंत्रसंगतीने मिळेल**



2. **गच्च माजतील राने -** **रुजतील देशी झाडे -**



फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उदयाचे, जपून ठेवू सृष्टी...

धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी?
रंग मजेचे, रंग उदयाचे

मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

ii ) एका वाक्यात उत्तरे लिहा. ( २ गुण )

अ ) दाट ताटवे कशाचे आहेत ?

आ ) मने कोणत्या रंगाची असावीत?

iii )कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा. ( २ गुण )

१) सृष्टी

२) पुष्टी

३) वृष्टी

४) तुष्टी

iv ) काव्यसौन्दर्य : ( २ गुण )

वसुंधरेचे हिरवेपण जपण्यासाठी पर्याय सुचवा.

**************

**प्रश्न 2 आ)** दिलेल्या मुद्दयांच्या आधारे 'रंग मजेचे रंग उद्याचे ' या कवितेच्या कृती सोडवा.

( खालील पैकी कोणत्याही 5 कृती विचारल्या जातील )

मुद्दे

१) कवयित्री : ( गुण १ )

२) कवितेचा विषय : ( गुण १ )

३ ) कवितेतून मिळणारा संदेश : ( गुण २ )

४ ) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे करण : ( गुण २ )

५ ) ओळींचा सरळ अर्थ लिहा. ( गुण २ )

धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...

६ ) शब्दांचे अर्थ लिहा. ( गुण २)

१. दृष्टी
२. हात
३. वृक्ष
४. दौलत


*****

# कविता १3 -- हिरवंगार झाडासारखं

प्र.2.(अ) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा. गुण 8

1. आकलन कृती ( 2 )

1) चौकट पूर्ण करा.




झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**2.** **चौकट पूर्ण करा.** ( 2 )

1)खालील गोष्टी पाहून कवीच्या मनात आलेले विचार लिहा.

अ)हिरवा रंग -------------------

ब)झाडांचे बाहु -----------------

2)संकल्पना स्पष्ट करा. ( 2 )

दव

**3.** **कवितेतील पुढील शब्दांचे अर्थ सांगा.** ( 2 )

i)गाणे -------- ii)झाड.-------

iii )नवरी-------. iv)पक्षी---------

**4.** **'अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब' या ओळीतील विचारसौंदर्य सांगा.** ( 2 )

***********

**प्रश्न 2** **आ) पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेच्या त्याखाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

## हिरवंगार झाडासारखं (8)

( खालील पैकी कोणत्याही 5 कृती विचारल्या जातील )

### मुद्दे

1) प्रस्तुत कवितेचे कवी /कवयित्री :- (1)

2) प्रस्तुत कवितेतचा विषय :- (1)

3) कवितेतील दिलेल्या ओळीचा सरळ अर्थ लिहा- (2)

'हसावं कसं सळसळत्या पानासारख '

4) कवितेत आलेल्या शब्दांचे अर्थ लिहा- (2)

i) शरीर = ---------- ii ) वस्त्र = ---------

iii)अलगद = ------ iv)मंजुळ = ---------.

5) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण - (2)

6) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश - (2)

*********

## स्वप्न करू साकार – किशोर पाठक

प्र.२)अ)पद्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. गुण (०८)

आकलन कृती

१. जोडया जुळवा. (०२)

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १.सुदर्शन चक्र | १.शुभंकर |
| २.मंत्र | २.शक्ती |
| ३.नौबत | ३.चैतन्य |
| ४.हस्त | ४.श्रमशक्ती |

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पि ढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ।।
फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्या चे फि रे सुदर्शन
शेतामधुनी पि कवू मोती, धन हे अपरंपार ।।
या हातांनी यंत्र डोलते
श्रम शक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ।।
हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट शक्तीचीही झडते नौबत
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।।
या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार ।।

2. एका वाक्यात उत्तरे लिहा. (०२)

१.कोणाचे स्वप्न साकार करायचे आहे?

२.शेतातील धान्याला कशाची उपमा दिली आहे?

3. कवितेत आलेल्या खालील शब्दांचा अर्थ लिहा. (०२)

१.मंगल –

२.तन –

३.ललकार –

४.विभव –

**४.खालील पंक्तींमधून सूचित होणारा अर्थ लिहा.** **(०२)**

या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करुया जयजयकार ॥

**आ)'स्वप्न करू साकार' या कवितेसंबंधी खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.** **(०८)**

१.प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – (०१)

२.प्रस्तुत कवितेचा विषय – (०१)

३.दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ लिहा (०२)

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ।।

४.प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश – (०२)

५.प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे – (०२)

६.प्रस्तुत कवितेतील दिलेल्या शब्दांचा अर्थ लिहा. (०२)

१)चैतन्य–

२)श्रम–

३)उद्योग–

४)उत्क्रांती–

## विभाग ३ : स्थूलवाचन

### स्थूलवाचन : मोठे होत असलेल्या मुलांनो...

1) डॉक्टर अनिल काकोडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन मोठे होत असलेल्या मुलांनो या पाठाच्या आधारे करा .
2) लेखकाचा बार्क मधील अनुभव तुमच्या शब्दात लिहा.
3) डॉक्टर होमी भाभा यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.
4) वैज्ञानिक व विद्यार्थी यांच्यातील संवाद स्वतःच्या कल्पनेने लिहा.

### स्थूलवाचन : जाता अस्ताला

1) जाता अस्ताला या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.
2) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वतःच्या कल्पनेने लिहा .
3) सूर्य ऊर्जेचा स्त्रोत या विषयावर जाता अस्ताला या कवितेच्या आधारे लिहा.
4) कवीने जाता अस्ताला मधील पणती च्या प्रतीकातून काय सूचित केले आहे.
5) प्रकाशाचे कोणतेही रूप आनंददायक हे विधान जात असताना या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

### स्थूलवाचन : व्युत्पत्ती कोश

1) व्युत्पत्ती कोश या पाठाच्या आधारे शब्दाचे विविध अर्थ व समान दिसणाऱ्या शब्दांचे अर्थ याविषयी सविस्तर लिहा.
2) व्युत्पत्ती कोश या विषयावर टिप लिहा.
3) व्युत्पत्ती कोश आजच्या युगात किती आवश्यक आहे ते उदाहरणे देऊन सांगा.

# विभाग ४ : भाषाभ्यास

## ४. अ) व्याकरण घटकावर आधारित कृती — गुण 8

### 1) वाक्यप्रकार : ( २ गुण )

- खालील वाक्याचा प्रकार ओळखा

1. शाल व शालीनता यांचा संबंध काय?
2. माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली.
3. तेल आणि तळलेले पदार्थ आधी सोडा.
4. प्रचंड स्फूर्तीदायक व्यक्तिमत्व होतं ते!
5. अब्दुल बस स्टॉपवर आला.
6. त्यांना मी कसा विसरु शकेन?
7. काका तुम्ही काही झाडं लावा.
8. किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना!
9. आमच्या जवळ एवढे पैसे कुठून येणार?
10. तुझा आवाका खूपच मोठा आहे.

### 2) वाक्यरुपांतर : ( २ गुण )

- कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा॰

1. यावर तो शालीन कवी मनापासून हसला. ( उद्गारार्थी करा )
2. लठ्ठपणा काय आपल्या हातात आहे? ( विधानार्थी करा )
3. मनाचं सामर्थ्य मोठं आहे. ( उद्गारार्थी करा )
4. प्रचंड स्फूर्तीदायक व्यक्तिमत्व होतं ते! ( विधानार्थी करा )
5. तपोवनाकडे कोण कशाला जातोय? ( विधानार्थी करा )
6. या खेळानेच मला जास्त भुरळ पाडली. ( उद्गारार्थी करा )
7. स्टेशन इथून खूप दूर होतं ( नकारार्थी करा )
8. तिथले शिक्षक मनानं खूप श्रीमंत होते. ( उद्गारार्थी करा )
9. त्यांना मी कधीही विसरू शकणार नाही.( प्रश्नार्थी करा )
10. तुमच्याशी मैत्री करायला खूप आवडेल मला. ( उद्गारार्थी करा )

### 3) वाक्प्रचार : ( ४ गुण )

कृती :

- **खालील पैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) गौरव वाटणे.
2) उसंत न लाभणे.
3) सक्त ताकीद देणे.

- खालील पैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1) वर्ज्य करणे.
2) खूणगाठ बांधणे.
3) आनंद गगनात न मावणे.

- खालील पैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1) नाव उज्ज्वल करणे.
2) हेवा वाटणे.
3) भुरळ घालणे.
4) देहभान विसरणे.

## आ ) भाषिक घटकांवर आधारित कृती : ( गुण –8 )

### 1) शब्दसंपत्ती –

#### अ) समानार्थी शब्द ( गुण –1 )

1) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

i. वृक्ष – ________

ii. आकाश – ________

2) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

i. मित्र – ________

ii. वारा – ________

3) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

i. काया – ________

ii. मार्ग – ________

4) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

i. हर्ष – ________

ii. मती – ________

5) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

i. नदी – ________

ii. पृथ्वी – ________

6) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

i. कान – ________

ii. फूल – ________

7) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

i. आवेश –

ii. होड –

8) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

i. आर्जव –

ii. बडगा –

आ) विरुद्धार्थी शब्द : ( गुण – 1 )

1) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. निरर्थक x

ii. गुण x

2) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. अवरोह x

ii. नापीक x

3) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. अनिवार्य x

ii. बिकट x

4) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. दुमत x

ii. ज्ञानी x

5) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. सुबोध x

ii. अल्पायुषी x

6) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. सुर्योदय x

ii. आधुनिक x

7) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. मालक x

ii. कमाल x

8) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. तिमिर x

ii. स्मरण x

9) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. दुष्कर्म x

ii. सहिष्णू x

१०) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. संक्षिप्त x

ii. सुपीक x

११) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

i. कृपा x

ii. ऊन x

**इ) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहिणे:** **( गुण – 1 )**

1) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. ज्याला मरण नाही असा –

ii. केलेले उपकार जाणणारा –

2) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. समाजाची सेवा करणारा –

ii. कुठलीही अपेक्षा न ठेवता –

3) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. संपादन करणारा –

ii. ज्याचे आकलन होत नाही असे –

4) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. महिन्यातून एकदा प्रकाशित होणारे –

ii. लिहिता वाचता न येणारा –

5) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. पसरवलेली खोटी बातमी –

ii. ज्याचे आकलन होत नाही असे –

6) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. दुसऱ्यावर अवलंबून असलेला –

ii. अपेक्षा नसताना –

7) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. केलेले उपकार न जाणणारा –

ii. लिहिता वाचता येणारा –

8) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणारे –

ii. कोणाचाही आधार नसलेला –

9) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा:

i. दररोज प्रकाशित होणारे –

ii. ज्याला कोणी शत्रू नाही असा

ई) वचन : ( गुण – 1)

1) खालील शब्दांचे वचन बदला.

i. रस्ता –

ii. वेळ –

2) खालील शब्दांचे वचन बदला.

i. भिंती –

ii. माणूस –

3) खालील शब्दांचे वचन बदला.

i. घडयाळ –

ii. विहीर –

उ) लिंग बदला : ( गुण – 1)

1) खालील शब्दांचे वचन बदला.

i. कवी –

ii. वाघ –

2) खालील शब्दांचे वचन बदला.

i. लेखक –

ii. माणूस –

3) खालील शब्दांचे वचन बदला.

i. वीर –

ii. संपादक –

2) लेखननियमांनुसार लेखन ( २ गुण )

i. अचूक शब्द ओळखा.

1) नीर्जीव / निर्जिव / निर्जीव / नीर्जिव.

2) अंतर्मुख / अतंर्मुख / अंर्तमुख / अंतर्मूख.

ii. अचूक शब्द ओळखा.

1) हुबेहुब / हूबेहूब / हुबेहूब / हूबेहुब.

2) क्रियाशील / क्रियाशील / क्रीयाशिल / क्रियाशिल.

iii. अचूक शब्द ओळखा.

1) शैक्षणिक / शैक्षणीक / शैक्षाणिक / शैक्शाणिक.

2) नीर्णय / नीणर्य / निर्णय / निणर्य.

iv. अचूक शब्द ओळखा.

१)वडीलांसोबत / वडिलांसोबत /वडिलानसोबत / वडीलानसोबत

(२) तालमि ला / तालमीला / ताल्मीला / ताल्मिला

(3) गारहाणी / गाऱ्हाणि / गाऱ्हा णी / ग्राहाणी

**किंवा**

- वाक्य लेखननियमांनुसार अचूक लिहा.

1) खालील वाक्यातील लेखननियमांनुसार चुकीचे शब्द ओळखून दुरुस्त करा व वाक्य पुन्हा लिहा.

1) ''काय हो हे, तुम्ही च फरशी पुसता आणी तुम्हिच ती घाण करता ?''.

2) आमचे मुळ गाव दक्षीण गोव्यातील माशेल..

2) खालील वाक्यातील लेखननियमांनुसार चुकीचे शब्द ओळखून दुरुस्त करा व वाक्य पुन्हा लिहा.

1) पण माझ्या आइनं धीर सोडला नाही.

2) अचानक मला जंगलाच्या कोपऱ्या वर थोडीशि हालचाल जाणवलि.

3. **विरामचिन्हे :** **( 1 गुण )**

- **खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा.**

| | | |
|---|---|---|
| 1) | . | ------------ |
| 2) | ? | ------------ |
| 3) | , | ------------- |
| 4) | : | ------------ |

- **खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा.**

| | | |
|---|---|---|
| 1) | ; | ------------ |
| 2) | ! | ------------ |
| 3) | ‘….’ | ------------- |
| 4) | “….” | ------------ |

**किंवा**

**1) योग्य विरामचिन्हे वापरा :**

1) तर मुलांनो आधी मी माझे दोन अनुभव सांगतो

2) सत्का र करण्या एवढे मी काय केले आहे तपोवनासाठी

3) रामानं सेतुबंधन केलं पण त्या साठी अनेकांचा हातभार लागला

4) अरे पण चिठ्ठी मराठीतून आहे

********

## विभाग ५ उपयोजित लेखन

प्र- ५ अ- खालील कृती सोडवा. गुण -६

१.पत्रलेखन - खालील निवेदन वाचा व कृती सोडवा.

**सुवर्ण संधी ! सुवर्ण संधी !!**

अक्षर पुस्तकालय,
राजापेठ, अमरावती

आयोजित

“मराठी भाषा संवर्धन पंधरवडा”

अंतर्गत

“सुलेखन कार्यशाळा”

स्थळ – संत ज्ञानेश्वर सभागृह,
अमरावती

दि. १२/०२/२०२१ ते २७/०२/२०२१
वेळ - सकाळी ११ ते दु. २ पर्यंत

किरण /किरणकुमार बेलसरे

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

शाळेतील वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासाठी कार्यशाळा आयोजकांना विनंती करणारे पत्र लिहा.

किंवा

सुलेखन कार्यशाळेत तुमच्या वर्ग मित्र /मैत्रिणीने विशेष प्राविण्य मिळविले. त्याबद्दल त्याचे /तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा .

**प्र- ५ अ- खालील कृती सोडवा.** **गुण -६**

**१ . पत्रलेखन :- पुढील जाहिरात वाचा आणि सुचनेनुसार कृती करा.**

पर्यटकांसाठी आनंदपर्वणी

## चला आनंद लुटू या !!

## वनश्री

कारंजा रोड, वाशिम, ४४४००३

**आमची वैशिष्ट्ये –**

- निसर्गाचे सान्निध्य
- विविध खेळाचा मनसोक्त आनंद
- सर्वांसाठी चविष्ट व रुचकर भोजनाची मेजवानी
- वय वर्षे ५ पर्यंतच्या बालकांना नि:शुल्क प्रवेश
- ५ वर्षापुढील सर्वांना अत्यंत माफक शुल्क
- टीप- 100 पर्यटकानाच प्रवेश

वेळ – दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ७ पर्यंत

आपण आजच बुकिंग करून आपला प्रवेश निश्चित करा.

संपर्क – भ्रमणध्वनी ९८७६५४३२१० इमेल- ........@gmail.com

एक पर्यटक या नात्याने वनश्री सहलीकरिता मा. व्यवस्थापकांना माहिती पत्रकाचे मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शालेय सहलीकरिता विद्यार्थ्यांना प्रवेश दारात सवलत मिळण्याकरिता व्यवस्थापकांना विनंती करणारे पत्र लिहा.

प्र- ५  अ- खालील कृती सोडवा. गुण -६

३. पत्रलेखन :- पुढील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती  सोडवा.

**त्वरा करा ! त्वरा करा !**



"वाचाल तर वाचाल"

# मातृसेवा पुस्तकालय,

नेताजी सुभाषचंद्र मार्ग, लातूर

**ता. जि. लातूर**

**दुकानाच्या वर्धापन दिनानिमित्त**

**आकर्षक सवलत**

विद्यार्थ्यांकरिता २०% सवलत

वाचकांकरिता १००० रुपये किंमतीच्या पुस्तकांवर विशेष भेट

वेळ- सकाळी १० ते  सायं. ८ पर्यंत

दि.- १ एप्रिल ते १५ एप्रिल २०२१ पर्यंत

वाचक या नात्याने मा. व्यवस्थापक यांना स्वत:साठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

शालेय ग्रंथालय प्रतिनिधी या नात्याने व्यवस्थापकांना शालेय ग्रंथालयासाठी मागवलेल्या पुस्तकांवर अधिक सवलत मिळावी यासाठी विनंती करणारे पत्र लिहा.

**प्र- ५ अ- खालील कृती सोडवा.** **गुण -६**

**४ . पत्रलेखन :- पुढील जाहिरात वाचा आणि सुचनेनुसार कृती करा -**

“सदरक्षणाय खलनिर्दालनाय”

**पोलीस स्टेशन, कारंजा**

**ता. कारंजा जि.नागपूर**

द्वारा आयोजित

**अभिनव उपक्रम**

“महिलांच्या सुरक्षेसाठी , पोलीस बांधव सदैव पाठी”

एक विनंती

निर्भयपणे संपर्क साधावा

“महिला सुरक्षा स्वतंत्र अँप”

**जयहिंद !**

**विकास विद्यालय, कारंजा येथील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने किशोरवयीन विद्यार्थ्यांकरिता सुरक्षाविषयक मार्गदर्शन करण्यासाठी मा. पोलीस अधिकारी यांना विनंती करणारे पत्र लिहा.**

**विकास विद्यालय, कारंजा येथील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने कारंजा पोलीस स्टेशन येथील कार्यरत बांधवांनी ‘अभिनव उपक्रम’ राबविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

प्र- ५ अ- खालील कृती सोडवा. गुण -६

५ . पत्रलेखन :- खालील निवेदनाच्या आधारे कृती सोडवा.

चला वाचवू वसुंधरा



माझी वसुंधरा अभियान

आयोजक

सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, सातनूर
ता.वरुड जि. अमरावती

-- वृक्ष लागवड कार्यक्रम --
१५ जून ते २५ जून

वृक्षमित्र या नात्याने आयोजकांना वृक्षलागवडीकरिता रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने ‘माझी वसुंधरा अभियानाचे’ आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

किंवा

2) सारांशलेखन

विभाग– १ गद्य (इ) [प्र.क्र . १ (इ )] मधील अपठित गद्य उताऱ्याचा.

१/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

# जाहिरात लेखन

**5 ( आ )खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** **गुण (10 )**

**1)जाहिरात लेखन :** **5**

पुढील विषयावर जाहिरात लेखन करा.

**अ . शब्दावरून जाहिरात लेखन.** **5**

१.पुढे दिलेल्या शब्दाच्या आधारे आकर्षक जाहिरात तयार करा.

ताजा भाजीपाला , सेंद्रिय पद्धतीचा वापर , सर्व प्रकारची फळे उपलब्ध , घरपोच सोय,

ऑनलाइन बील देण्याची सोय, ग्राहकांचे समाधान.

**अ . पुढे दिलेल्या विषयावर आकर्षक जाहिरात लेखन.** **5**

"ज्ञानश्री" दुधडेअरी व ड्रायफ्रुट विक्रेते.

**क. पुढे दिलेल्या विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.** **5**

"उन्हाळी शिबिराचे आयोजन"

ड .पुढे दिलेल्या जाहिराती खालील कृती सोडवा.

**अंबा फेस्टिवल, अमरावती,**

**द्वारा आयोजित**

## हौशी मराठी नाट्याचे आयोजन

दि. – १५ मार्च सायंकाळी – ६ वाजता

**स्थळ – संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह , मोर्शी रोड , अमरावती**

**हे रंग जीवनाचे**

लेखक- नेताजी भोईर

दिग्दर्शन – नेताजी भोईर

संगीत – वरूण भोईर

नेपथ्य – सर्वेश पाटील

**सशाचे घर**

लेखक- उज्वला केळकर

दिग्दर्शन- अमित आग्रे

संगीत – आशिष जगताप

नेपथ्य – सर्वेश पाटील

कृती –

१)नाटिकेचे आयोजन करणारी संस्था कोणती? (१)

-------------------------------------------------------------------

२) नाटकाचे आयोजन कोणत्या सभागृहात केले आहे? (१)

-------------------------------------------------------------------

३) नाटके कोणत्या तारखेला आयोजित केले आहे? (१)

-------------------------------------------------------------------

४) सशाचे घर नाटकाचे लेखक कोण आहे? (१)

-------------------------------------------------------------------

५) हे रंग जीवनाचे या नाटकाचे नेपथ्य कोणी केले आहे? (१)

-------------------------------------------------------------------

**ई.पुढे दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक स्वरुपात पुनर्लेखन करा.**

**घरच्या जेवणाची आठवण येते ,**

**मग एकदा आम्हाला अवश्य भेट द्या.**

**“रुपराव शिंदे खानावळ”**

**एकदा अवश्य भेट द्या.**

**तुमच्या मनासारखे घरगुती जेवण.**

**घरच्या सारखी चव.**

**गरमागरम जेवण मिळण्याचे एकमेव ठिकाण .**

**स्वच्छतेची हमी**

**स्वच्छतेसाठी सर्व उपाय योजना.**

**वाजवी दरात जेवण.**

**माहेवारीची सोय.**

**वेळ-**

सकाळी- ११ ते २ वाजे पर्यंत

सायंकाळी- ७ ते रात्री १० वाजेपर्यंत

**स्थळ-**

श्री. रुपराव शिंदे

यांच्या राहत्या घरी आठवडी बाजार ,

# बातमी लेखन

**१) पुढील विषयावर बातमी तयार करा.**

जनता गर्ल्स हायस्कूल, शेंदूरजना घाट येथे "जागतिक महिला दिन" साजरा झाला.

या कार्यक्रमाची बातमी तयार करा.

**२) पुढील समारंभाची बातमी तयार करा.**

शाळेच्या सुवर्ण महोत्सवाचा उद्घाटन समारंभ माननीय शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

**३) दिलेल्या शब्दावरून बातमी तयार करा.**

शाळा-------कोरोना ------मोबाईल-------शिक्षण सुरु -------अभ्यासक्रम -----समस्या

**४) पुढील घटनेवर आधारित बातमी तयार करा.**

कोरोना आला नी -----------------

गाव स्वच्छ झाले.

**५ ) पुढील शीर्षकावरून बातमी तयार करा.**

बालिका दिन निमित्त्य , "बेटी बचाओ ! बेटी पढाओ !" या उपक्रमास जिल्ह्यातील अनेक

शाळेकडून उत्स्फूर्त प्रतिसाद.

# कथालेखन

**प्रश्न ५ ( आ ) खालील मुद्द्यांवर आधारित कथा लेखन करा.**

१) लक्ष्मण नावाचा तरुण---कैदेत----गावप्रमुखाचे कैदखान्याचे निरीक्षण करणे----लक्ष्मणची सुटकेसाठीची विनंती----सुटका व आर्थिक मदत----लक्ष्मण पक्षी बाजारात---- सर्व पक्षी पिंजऱ्या सहित विकत घेणे----पक्षी विक्रेत्याच्या चेहेऱ्यावर प्रश्नचिन्ह----पक्ष्यांची पिंजऱ्यातून मुक्तता-----मुक्ततेचा आनंद----बोध

२) गरीब शेतकरी----कोरडवाहू जमीन----कठोर परिश्रम-----शेतीत नवनवीन प्रयोग-----उत्पन्नात भरभराट-----यशस्विता--- आनंद---- इतरांना मार्गदर्शन----राष्ट्रीय पुरस्कार------बोध

३)जंगलातील वृक्ष-----चिमणीचे जोडपे-----गुण्यागोविंदाने राहाणे--_हत्तीचा धुमाकूळ-----पिले मारणे----

चिमणा-चिमणीचा आक्रोश----सुतार पक्षाचा सल्ला व प्रेरणा--- हत्तीची समजूत----बोध.....

४) मार्च २०२० ----परीक्षा कालावधी---- विद्यार्थ्यांची परीक्षेची तयारी---- कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव----सामाजिक परिस्थिती-----विद्यार्थ्यांची निराशा-----निकाल---- --बोध.

**प्रश्न ५ ( आ ) खालील कथालेखन करा .**

१) महेंद्र नावाचा विद्यार्थी --हलाखीची परिस्थिती--रानात रोपटयांचा शेंडा तुटलेला पाहाणे--- मनात विचार-- आत्मज्योत

जागृत होणे--- प्रयत्नांची पराकाष्ठा-- यशस्विता--लेखक म्हणून प्रसिद्धी.

२) रतन नावाचा तरुण- -साधारण जीवनशैली --अडगळीतील वस्तु---कल्पनाशक्तीचा वापर --जोडणी--शेतीसाठी उपयुक्त यंत्र निर्मिती-- उपयोग--- राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त.

३) रोहिणी नावाची मुलगी-- कुटुंबात तिघी बहिणी--- परिस्थिती सर्वसाधारण--रोहिणी हुशार-- तिघींची जिद्द--शिक्षणाबरोबर शेतीकाम--मोठे स्वप्न- स्वप्न साकार-- तिची पोलिस अधीक्षक, शिक्षिका,व सनदी अधिकारी म्हणून नियुक्ती.

**प्रश्न ५ ( आ ) खाली दिलेल्या कथेचा उत्तरार्ध लिहा.**

**१** )आदिवासी समाजात असणाऱ्या राजू नावाच्या मुलाला शिक्षणाची आवड असल्याने तो रानावनात झाडांच्या खोडांवर जमिनीवर अक्षरे गिरवायला शिकला. त्याची ती शिक्षणाची ओढ पाहून आई-वडिलांना आश्चर्य वाटत असे. असेच एकदा क्षेत्रभेटीसाठी सुहास नावाचे गुरुजी विद्यार्थ्यांना घेऊन त्या भागात आले. त्यांनी राजूची अभिलाषा ओळखली आणि त्याच्या आई वडिलांची परवानगी घेऊन राजूला आपल्या शाळेत दाखल केले आणि................

२) नंदुरबारच्या खर्डी या आदिवासी गावात रिंकी नावाची मुलगी दगड मातीतून धावायची. सात भावंडांमध्ये पाचव्या नंबरची मुलगी होती. घरी कोरडवाहू शेती होती. त्यामुळे तिच्या आई-वडिलांना इतरांच्या शेतात काम करणे व उन्हाळ्याच्या दिवसात मजुरीसाठी गावाबाहेर पडावे लागायचे . सर्व भावंडे मात्र घरीच असायची. यातच मोठ्या भावाला पळण्याचे वेड असल्याने तो पळण्यात तरबेज झाला. पुढे जाऊन त्याने स्पर्धेत भाग घेतला. या धावण्याच्या वेडामुळेच पुढे जाऊन त्याला वनरक्षक होण्याचं भाग्य लाभलं. त्याच्यापासून प्रेरणा घेऊन रिंकी सुद्धा धावू लागली आणि................

**३**) एका गावात रामकृष्ण आणि शेवंता नावाचं सामान्य परिस्थितीतील कुटुंब राहत होतं. त्यांना राकेश व प्रांजल नावाची दोन अपत्ये होती. राकेश आणि प्रांजली दोघेही हुशार आणि आज्ञाधारक होती. अचानक सहा वर्षाची असतानाच प्रांजलची दृष्टी गेली.आईवडिलांना धक्का बसला ,पण ते डगमगले नाहीत . त्यांनी तिचा शिक्षणाकडे असलेला ओढा तिची जिद्द आणि चिकाटी पाहून तिला अंध मुलांच्या शाळेत घातले. तिची अभ्यासातील हुशारी शिकण्याचा वेग , चिकाटी आणि मेहनत घेण्याची अभिलाषा पाहून शिक्षकांनी ही तिची सर्वतोपरी मदत केली आणि पुढे ती.............

**४)** रमणलाल नावाच्या व्यापाऱ्याला तीन मुले होती. व्यापाराचा चांगला जम असल्यामुळे रमणलालची परिस्थिती अतिशय उत्तम होती. मुलांमध्ये मात्र नेहमी वाद-विवाद आणि भांडणं होत त्याला तो कंटाळला. त्याने एका मित्राच्या सल्ल्यानुसार त्याने आपल्या मुलांना जवळ बोलावून सांगितले की,माझं आता वय झाल्यामुळे यापुढे व्यापार तुम्ही बघावा. पण आधी मी तुमची परीक्षा घेईन त्यात जो पास होईल त्याच्या हातात मी व्यापार देईल. त्याने तिघा मुलांना सारखे पैसे वाटले. आणि..............

**प्रश्न ५ ( आ ) खालील शीर्षकावरून कथा लेखन करा.**

१) एकीचे बळ

२) ऐकावे जनाचे करावे मनाचे

३) कष्टाची गोड फळे

४) प्रामाणिकपणाचे फळ

५) बुद्धी आणि ताकदीचा मेळ

६) पळसाला पाने तीनच

७) कोल्ह्याला द्राक्ष आंबट

८) अति तिथं माती

९) प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलहि गळे.


१०) विज्ञानाची कास धरा

११) पर्यावरणाचे रक्षण काळाची गरज.


# निबंधलेखन

**5 .(इ )खालील लेखनप्रकारापैकी कोणतीही कृती सोडवा :** **गुण (8 )**


**वैचारिक लेखन 1**





2



3


सुसंवाद काळाची गरज
भावनिक गरज
जीवन समृद्धी
कुटुंबियांसोबतचे बोलणे
मन आनंदी व स्थिर राहण्यास मदत
मित्र मैत्रिणींसोबतचा संवाद
धोके टाळण्याचा मार्ग.

4


भाषेचे महत्त्व
जीवन समृद्ध होण्यात भाषेचे योगदान
शब्दभांडार वाढविण्याचे मार्ग व्यवहारात उपयोग

5

पाणी हेच जीवन

जल है तो कल है

जलसाक्षरता : काळाची गरज

जलसंवर्धनाचे मार्ग.

अपव्यय केल्याने होणारे तोटे



## 2 आत्मकथन

**दिलेल्या मुद्दयांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :**

1

'मी एस.टी बोलतेय...'

लॉकडाऊन काळात प्रथमच बंद

अल्पदरात सोयीचा प्रवास



दळणवळण विस्कळीत

२४ तास अखंड सेवा

लोकजीवनातील महत्त्व

अल्पदरात सोयीचा प्रवास

खेड्यापाड्यात सर्वदूर सेवा

2

' सफाई कर्मचाऱ्याचे मनोगत '

श्रमप्रतिष्ठेचा संदेश




स्वच्छता हीच सेवा

लोकांची मानसिकता

अखंड काम

कोरोना संकट - काळातील आव्हाने

3

' मी शाळा बोलतेय....'

धोकादायक जीवन

विद्यार्थी हेच जीवन



समाज मंदिर

कोरोना काळातील स्थिती

समाजजीवनातील स्थान

4

'मोबाईलचे आत्मकथन'

अतिवापराचे दुष्परिणाम




लोकप्रियता

सुयोग्य वापर

वाढती गरज

वापरताना घ्यावयाची काळजी

5

अन्नदाता शेतकरी मी

काळ्या आईवर प्रेम

आर्थिक चणचण / कर्जबाजारीपण



सरकारी मदतीची गरज

पावसावरील अवलंबन

मुलाबाळांची स्वप्न पूर्ण करण्याची अपेक्षा

आधुनिकतेची कास

## 3 प्रसंगलेखन

1

माझी जंगल सफर

मानवी वस्तीपासून दूर गेल्यावर आलेला अनुभव

मनावर झालेला परिणाम



वनस्पती व प्राणी जीवनाची विविधता

निरीक्षणातून गवसलेल्या नवीन गोष्टी

**2**

' लॉकडाऊन संपल्यानंतरचा शाळेचा पहिला दिवस '

अभिनव पद्धतीने केलेले स्वागत

मित्र-मैत्रिणींना खूप दिवसांनी पाहिल्यावर



शाळेची इमारत व शिक्षक यांना पाहून मनात आलेले विचार, भावना


शिकण्यातला बदल, हुरहूर उत्सुकता इत्यादी

**3**

'वाचन प्रेरणा दिन '

कथांचे अभिवाचन

साहित्यिक / लेखकांना पाहण्याची व ऐकण्याची



सामुदायिक काव्यगायन

बालसाहित्याचे ऑनलाईन प्रदर्शन

वाचनातून मिळालेला आनंद

**4**

'मी फुलवलेली बाग '

लागवड करताना मिळालेला आनंद

फुलझाडांची लागवड



कुटुंबियांचे सहकार्य

भाजीपाला लागवड

सेंद्रिय खताचा वापर

**5**

**' मी बनवलेला पहिला पदार्थ '**



पदार्थ बनवण्याची संधी अशी मिळाली...

केलेली पूर्वतयारी

आईचे मार्गदर्शन

पदार्थ बनवताना झालेला आनंद

झालेली फजिती / त्रास

**********************************************************************************
**********************************************************************************